
# वंदन राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना!



खंजिरीच्या तालावर भजनांमधून लोकांमध्ये देशभक्ती जागृत करणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना 116 व्या जयंतीनिमित्त (30 एप्रिल) विनम्र अभिवादन! धार्मिकतेला सामाजिक बांधिलकी, बंधुता आणि मानवसेवेची जोड देणारे संत म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज.

## ग्रामगीता: जीवन जगण्याचा मार्ग

'ग्रामनाथ' म्हणजेच शेतकरी-शेतमजूर हा राष्ट्रसंतांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. राष्ट्रसंतांनी गोरगरीबाला 'नाथा'ची म्हणजेच देवाची उपमा दिली. भारत हा खेड्यांचा देश आहे, म्हणून ग्राम आणि 'ग्रामनाथाच्या' विकासाशिवाय देशाचा विकास अशक्य आहे, अशी त्यांची श्रद्धा होती. या 'ग्रामनाथाला' जागृत करण्यासाठी त्यांनी 'ग्रामगीता' लिहिली.

**म्हणोनी केली 'ग्रामगीता' । जागृत व्हाया ग्रामदेवता ॥**


गोरगरिबांचे कल्याण, जातीभेद-अस्पृश्यता निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्वधर्मसमभाव, महिलांची उन्नती- या सर्वांच्या माध्यमातून समाजाच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न राष्ट्रसंतांनी पाहिले. हाच 'ग्रामगीतेचा' विचार आहे, जो आपल्याला भारतीय संविधानात पावलोपावली दिसून येतो.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि भारतीय संविधान

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा विचार आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता, सर्वधर्मसमभावाची शिकवण देणाऱ्या भारतीय संविधानाचा विचार एकमेकांना परस्पर पूरक आहेत. राष्ट्रसंतांनी आयुष्यभर या विचारांचा जागर आणि प्रसार केला.

### स्वातंत्र्य

कलम 19-22



**झाडझडूले शस्त्र बनेंगे, भक्त बनेंगी सेना ।**
**पत्थर सारे बम बनेंगे, नाव लगेगी किनारे ॥**

महात्मा गांधींनी सुरू केलेल्या 'भारत छोडो' आंदोलनात तुकडोजी महाराजांनी उडी घेतली. 'भक्त बनेंगी सेना' या भजनांद्वारे युवा पिढीत स्वातंत्र्य प्रेम जागवले. आष्टी-चिमूर संग्रामात सहभागी होण्यास लोकांना प्रेरणा दिली. देशासाठी त्यांनी चार महिने तुरुंगवासही सोसला. तुकडोजी महाराजांना देश फक्त इंग्रजांच्याच नाही तर प्रत्येक अनिष्ट विचारांच्या तावडीतून स्वतंत्र करायचा होता. मानवाची मुक्ती (स्वातंत्र्य) हे त्यांचे एक प्रमुख ध्येय होते.

### समता

कलम 14-18

राष्ट्रसंतांनी समानतेवर आधारित समाजाची कल्पना केली होती. यासाठी युवा पिढीला आवाहन करतात,

**जागो बालको, युवक युवतीयो बुलंद करो आवाज, पिछडो को लो साथ,**
**अनपढ को दो हाथ, करो मानव एक जात, समता की हो बात**

### बंधुता



बंधुता म्हणजे एकमेकांबद्दल आदर आणि प्रेम. राष्ट्राची एकता आणि सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्यासाठी हे अत्यंत महत्वाचे मूल्य संविधानाच्या उद्देशिकेत नमूद केलेले आहे. राष्ट्रसंत म्हणतात,


**या भारतात बंधुभाव नित्य वसू दे, दे वरचि असा दे ।**
**हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे, मतभेद नसू दे ॥**

### लोकशाही

संविधानाने सर्वसामान्य लोकांनाच देशाचे खरे मालक बनवले. सत्तेत असलेल्यांनी 'स्वत:ला मालक समजू नये' अशी ताकीदही राष्ट्रसंत देतात.

**लोकशाहीत जो सत्ताधारी । तो मालक नव्हेचि निर्धारी ।**
**लोकसेवेचा कारभारी । जबाबदारी ही त्याची ॥**





## धर्मनिरपेक्षता
**कलम 25**

भारतात अनेक धर्मांचे-पंथाचे लोक राहतात. या सर्वांना एकत्र सुखसमाधानाने राहाता यावे; त्यासाठी आपण आपल्या मनाचे 'मंदीर' सर्वांसाठी खुले ठेवले पाहिजे; जाती-धर्माच्या नावाने पसरणारा द्वेष बाजुला सारून एकमेकांशी प्रेमाने आणि एकतेने वागा, असा संदेश तुकडोजी महाराज आपल्याला देतात. हेच मूल्य संविधानातही नमूद केलेले आहे.

**सब के लिये खुला है मंदिर ये हमारा । मतभेद को भुला है मंदिर यह हमारा ॥**
**आओ कोई भी धर्मी, आओ कोई भी पंथी । देशी-विदेशीयो को मंदिर ये हमारा ॥**

## समाजवाद
**मार्गदर्शक तत्वे**

अन्न-वस्त्र-निवारा-आरोग्य-शिक्षण या मूलभूत गरजा पूर्ण झाल्याशिवाय गरीबाच्या घरात सुख-शांती नांदू शकत नाही. काहींनी खूप बुद्धी लढवून अतोनात संपत्ती जमवली आहे. 'त्यामुळे शासनाने देशातील आर्थिक विषमता कमी करावी- हाच खरा राजधर्म आहे,' असे परखड विचारही ते मांडतात:



**जैसे बापास पुत्र सारिखे । तैसे गरीब, श्रीमंत राजाचे सखे ।**
**हा भेद मिटविणे काम निके । त्याचेचि असे राजधर्म ॥**

## स्त्री-पुरूष समानता
**कलम 15**



संविधानाने सर्व महिलांना समानतेचा आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला आहे. महिलांना दुय्यम लेखणारे सर्व विषमतावादी विचार आपण झुगारून लावले पाहिजे, असे राष्ट्रसंत म्हणतात.

**हीन-दुबळें केलें स्त्री-समाजा । तैसीच पुढे वाढली प्रजा ।**
**म्हणती स्त्रीजात तेवढी पशूच समजा । पाशवी झालें जग सारें ॥**
**सर्व सोयी पुरुषांकरितां । स्त्रियांसाठी सर्व व्यथा ।**
**हें कोण बोलतें शास्त्र आता? द्यावें हातां झुगारोनि ॥**

## सामाजिक न्याय
**कलम 38**

शोषित समाजाला विकासाची संधी उपलब्ध करून देणे म्हणजे सामाजिक न्याय.

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, संत गाडगे महाराज यांच्याकडून आलेला वारसा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढे नेला. हाच विचार तुकडोजी महाराजांनी लोकांना दिला. दलितांच्या उद्धाराचे कार्य करणे, हीच खरी धर्मसेवा आहे, असे ते म्हणतात

**महात्मा गांधी, ज्योतिबा फुले । यांनी मर्म हें ओळखलें ।**
**दलितोन्नतीचें कार्य केलें । कर्तव्य आपुलें तेंचि असे ॥**
**मानवें मानवा समान समजणें ... हीच खरी धर्मसेवा ॥**




राष्ट्रसंतांच्या 'ग्रामनाथाची' खरी उन्नती आणि बंधुतेवर आधारित समाज हे सर्व भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीतूनच शक्य आहे. त्यामुळे चला, ग्रामगीता आणि भारतीय संविधानाचा विचार गावागावापर्यंत पोचवूया. 'संविधान जागर अभियान' यासाठी प्रयत्न करत आहे. आपणही यात सहभागी व्हावे, असे प्रेमपूर्वक आवाहन!

**तन-मन-धन से सदा सुखी हो, भारत देश हमारा ।**
**सभी धर्म अरु पंथ पक्ष को, दिल से रहे पियारा ॥**
**विजयी हो, विजयी हो, विजय हो, भारत देश हमारा ॥**

॥ श्री गुरुदेव की जय ॥ ॥ जय संविधान ॥

**संविधान जागर अभियान**

निमंत्रक समिती: मा.न्या.बी.जी. कोळसे पाटील, प्रा.डॉ. सुखदेव थोरात, तुषार गांधी, उत्तम कांबळे, डॉ. राम पुनियानी, डॉ. नितीन राऊत, धनाजी गुरव, नीरज जैन

स्वप्निल फुसे: 79723 45764 | नागार्जुन वाडेकर: 98602 39899 | राजाभाऊ करवाडे: 98222 02739 samvidhanjagar.org